# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.


Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


१३ जुन, २०२०

# स्थानिक गुन्हे शाखेची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

दिनांक १२/०६/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम घुग्घुस मार्गे चंद्रपुर कडे एका चारचाकी वाहनाने अवैध रित्या दारूची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून स्थागुशा पथकाने धानोरा फाटा टोल नाक्याजवळ नाकेबंदी लावली आणि मिळालेल्या माहिती वरून एका चारचाकी टाटा मालवाहु वाहन क्र. एम एच ४० बीजी ३२८९ यास थांबवुन वाहनातील मालाबाबत विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये अवैध रित्या दारूचा साठा मिळुन आला. ज्यामध्ये २७० बॉक्स देशी दारू किं. २७,००,०००/—रू. चा दारूचा माल जप्त करण्यात आला असुन, वाहतुकीकरीता वापरलेला टाटा कंपनीचा वाहन क्र.एम एच ४० बीजी ३२८९ किं. ५,००,०००/—रू, एक मोबाईल फोन किं. ५,०००/—रू असा एकुण ३२,०५,०००/—रू चा मुददे्माल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन घुग्घुस येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे कपील रामदास वेलतुरकर वय ३१ रा. ईतवारी पेठ उमरेड. जि. नागपुर यास अटक करण्यात आली असुन पुढिल तपास घुग्घुस पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक डॉ.श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात सपोनि. जितेंद्र बोबडे, पोउपनि. विकास मुंढे, सफौ. पद्माकर भोयर, पंडीत वऱ्हाटे, नितीन जाधव, पोशि. अमोल धंदरे, नितीन रायपुरे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————

# संचारबंदी चे उल्लंघन आणि चेहऱ्यावर मास्क न लावता फिरणाऱ्या आरोपीस न्यायालयाने ठोठावली शिक्षा

पोलीस स्टेशन धाबा अंतर्गत कोरोना विषाणु प्रादुर्भाव संदर्भाने केलेल्या कलम २६९ आणि २७० भादंवि मधील आरोपीस दिनांक १२/०६/२०२० रोजी मा. श्री. टी.पी. मोरे, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गोंडपिंपरी यांनी आर्थिक दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

दिनांक २६/०४/२०२० रोजी पोलीस स्टेशन धाबा येथील तीन इसमांविरूध्द संचारबंदीचे उल्लंघन करीत असल्याबाबत कार्यवाही करण्यात आली होती. हे संचारबंदी दरम्यान स्वत:च्या आणि इतरांच्या जिवीतास धोकादायक असलेल्या कोविड—१९ रोगाचा संसर्ग पसरेल हे माहित असुन सुध्दा आपल्या चेहऱ्यावर कोणतेही मास्क न लावता स्वत:चे वाहन बेकायदेशिररित्या आणि हयगयीने चालवितांना मिळुन आले. सदर इसमांवर कार्यवाही करून त्यातील **आरोपी नामे प्रदिप भाउराव फरकाडे, वय ३५ रा. हिवरा. ता. गोडपिंपरी** यास मा. न्यायालयापुढे हजर केले असता, **मा. श्री. टी.पी. मोरे, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गोंडपिंपरी** यांनी सदर आरोपीने गुन्हा कबुल केल्याने कलम २६९ भांदवि अन्वये **५००/—रू दंड** आणि कलम २७० अनव्ये **१,०००/—रू** दंडाची शिक्षा, दंड न भरल्यास दोन दिवस साधा कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

## आवाहन

पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी चंद्रपूर जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन केले आहे की, चंद्रपूर जिल्हयात कोरोना **(Covid-19)** विषाणु चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाद्वारे निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन नागरीकांनी काटेकोरपणे करुन स्वत:चे आणि इतरांचे जिव धोक्यात टाकु नये. तसेच पोलीसांना सहकार्य करावे. आदेशाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

———————————————————————————————————